# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**घनसावंगी व अंबड (जि.जालना) तालुक्यातील महा-ई-सेवा केंद्र व संग्राम कक्षांची संख्या कमी असल्याबाबत**

**(१) ४८५८८ (२०-०४-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घनसावंगी व अंबड (जि.जालना) तालुक्यातील महा-ई-सेवा केंद्र व संग्राम कक्ष कमी आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) महा-ई-सेवा केंद्राची संग्राम कक्षाची संख्या कमी असल्यामुळे तेथील नागरीकांना ब-याच अडचणींना समोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महा-ई-सेवा केंद्र व संग्राम कक्षाची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :**(१) हे खरे नाही. घनसावंगी येथे १३७ व अंबड येथे १४१ महा-ई सेवा केंद्र कार्यान्वीत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोंडाणे धरण प्रकल्पात (जि.रायगड) अधिकारी व कंत्राटदारांनी केलेल्या गैरव्यवहारबाबत**

**(२) ६५६१८ (१६-०१-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंडाणे धरण प्रकल्पातील (जि.रायगड) अधिकाऱ्यांच्या संगनमताने एएफ कन्स्ट्रक्शन कंपनीस अटी शर्तीची पुर्तता न करता काम देण्यात आल्याने संबंधीत अधिकाऱ्यासह एएफ इंटरप्राइजेस कंपनीच्या ठेकेदारावर कोपरी पोलीस ठाण्यात गैरव्यवहाराचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २७१ कोटीं रुपयांच्या कामामध्ये तत्कालीन कार्यकारी संचालक श्री. डी.पी. शिर्के, बा.भा. पाटील, आर.डी. शिंदे, प्र.भा, सोनवणे, अ.पा. साळुंके, रा.च. रिठे, व एएफ इंटरप्राइजेस चे निसार खत्री हे दोषी आढळल्याने त्यांच्यावर माहे सप्टेंबर ते ऑक्टोबर या काळामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१८) :** (१) व (२) होय.

१) देवेंद्र परशुराम शिर्के, तत्कालीन कार्यकारी संचालक कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे २) बाळासाहेब भाऊसाहेब पाटील तत्कालीन मुख्य अभियंता जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई ३) प्रल्हाद भटु सोनावणे, तत्कालीन मुख्य अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ ठाणे ४) रामचंद्र दगडु शिंदे, तत्कालीन अधीक्षक अभियंता, ठाणे पाटबंधारे मंडळ ठाणे ५) आनंदा साळुंखे, तात्कालीन अधीक्षक अभियंता, ठाणे, विभाग कोलाड ६) श्री. राजेश चंद्रकांत रिठे, तत्कालीन सहायक अभियंता, श्रेणी-१, कार्यकारी अभियंता (अतिरिक्त कार्यभार) रायगड पाटबंधारे विभाग कोलाड, रायगड ७) निसार फतेह मोहम्मद खत्री, ठेकेदार यांचेविरूध्द कोपरी पो.स्टे.कॉ.गु.र.नं. ८१/२०१६ भा.द.वि.सं.क.४२०, १२० (ब), १०९, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमातील, १३(१) (सी) (डी) सह १३(२) हा गुन्हा दिनांक ०३.०९.२०१६ रोजी दाखल केला आहे.

(३) व (४) आरोपीविरूध्द दिनांक ११.०९.२०१७ रोजी मा.विशेष न्यायालय, ठाणे येथे दोषारोपपत्र दाखल करण्यांत आले असून त्याचा स्पेशल केस नंबर ३६/२०१७ आहे. सदर गुन्हा मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

विलंब झालेला नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयात अवैध दारुविक्री मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत

**(३) ७८७३७ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात दारुबंदीनंतरही अवैध दारुविक्री मोठ्या प्रमाणात सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध दारु विक्रीमध्ये पोलीस विभागातीलच काही कर्मचारी दारु तस्करीत सक्रिय असून माहे जानेवारी, २०१७ मध्ये एका पोलीस कर्मचा-याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दारुसाठ्यासह अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, त्यानुसार दारुबंदीनंतरही अवैध दारुविक्रीवर प्रतिबंध घालणे तसेच अटक केलेल्या पोलीस कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक १ एप्रिल २०१५ पासून दारुबंदी लागू करण्यात आली आहे. गोपनीय अहवालानुसार वारंवार पोलीसांमार्फत खाली दर्शविल्या प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

| सन | एकूण केसेस | अटक आरोपी | जप्त माल | कलम ९३ मदाका | कलम ५६ मुपोका | एमपीडीए |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१४ | २०९४ | २२४६ | ४३३८२२६ | ५४२ | ९४ | -- |
| २०१५ | ५४८७ | ६८८४ | ८९९४६४९८ | ६०६ | २९ | -- |
| २०१६ | ६९४० | ७२६१ | १४४६४६२५४ | ८९९ | २४ | २३ |
| ३० एप्रिल, २०१७ पर्यंत | २६४८ | २७१४ | ६८६४७७४० | २४८ | ३ | १ |
| एकूण | १७१६९ | १९०७५ | ३०७५७८७१८ | २२९५ | १५० | २४ |

(२) हे खरे आहे.

दिनांक ९/१/२०१७ रोजी पोउनि, स्थानिक गुन्हे शाखा, हे पो.स्टे. रामनगर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय सुत्राकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्राव्हिशन रेड कामी पोलीस स्टाफच्या मदतीने जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखा चंद्रपूर कार्यालयाजवळ नाकेबंदी केली असता नाकेबंदी दरम्यान दोन आरोपींजवळ एकूण ४,०७,८०० रुपयाचा दारुसाठा मिळून आला. त्यापैकी एक आरोपी पोलीस विभागात नापोशि या पदावर पो. स्टे. दुर्गापूर येथे तैनात असून संलग्न पोलीस मुख्यालय, चंद्रपूर येथे कार्यरत आहे.

(३) सदर प्रकरणी आरोपीस दि.९/१/२०१७ रोजी अटक करुन १ दिवसाचा एमसीआर प्राप्त करुन सविस्तर विचारपूस करुन एमसीआर मंजुर झाल्याने त्यास एमसीआर वर पाठविण्यात आले आहे. आरोपीचा मा.न्यायालयाने दि.२४/२/२०१७ रोजी जामीन मंजूर केला आहे. आरोपी विरुध्द भरपूर पूरावा मिळून आल्याने पडताळणी अंती आरोपी विरुध्द दोषारोपपत्र क्र.१०८/१७, दिनांक ९/३/२०१७ अन्वये क्रि. के.नं. १३४२/१७ तयार केले आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर, यांचे आदेश दिनांक १०/१/२०१७ अन्वये सदर आरोपी विरुध्द मुंबई पोलीस शिक्षा व अपील १९५६ मधील नियम ३ (अ) (२) या अधिकाराचा वापर करुन निलंबित करण्यात आले असून त्याच्या विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अणुशक्तीनगर (मुंबई) येथे होत असलेले अनधिकृत पार्किंग

**(४) ७९३१६ (१३-०४-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अणुशक्तीनगर विधानसभा कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनधिकृत पार्किंग वाढत असून खाजगी बसेस तसेच ज्वलंतशील केमिकल्सने भरलेले टँकर्स रस्त्याच्या दुतर्फा उभे राहत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडी होऊन विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिला, कामगार इत्यादींना अनेक गैरसोयीनां सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिंनी सातत्याने संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करूनही अद्याप कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार उक्त अनधिकृत पार्किंग हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ट्रॉम्बे वाहतूक विभागाच्या हद्दीत गडकरी खाण, शंकर देऊळ, आशिष जंक्शन या ठिकाणी अनधिकृत पार्किंग होऊ नये याकरीता दोन शिफ्टमध्ये प्रत्येक जंक्शनवर वर्दळीच्या ठिकाणी अंमलदारांची नेमणूक करुन योग्य ती कार्यवाही केली जाते. तसेच बि.पी.सी.एल. कंपनीकडून पुरविण्यांत आलेल्या ट्रॅफिक वार्डनमार्फत वाहतूकीचे नियंत्रण व नियमन सुरळीत केले जाते. सर्वसामान्य नागरीकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जाते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सन २०१७ मध्ये एकूण ४,३८६ अवजड वाहनांवर मोटार वाहन कायदा व नियमान्वये कारवाई करण्यांत आली आहे, तर माहे जानेवारी ते मे, २०१८ अखेरपर्यंत एकूण ३,१९३ अवजड वाहनांवर कारवाई करण्यांत आली आहे. मैत्रीपार्क व इतर ठिकाणी अवैध प्रवाशी वाहतूक करणाऱ्या एकूण १७ खाजगी बसेसवर कारवाई करण्यांत आली असून सदरची कारवाई सतत सुरु आहे. त्याचप्रमाणे ७३ खाजगी ट्रॅव्हल्स बसेसवर नो पार्किंग / डबल पार्किंग केले म्हणून कारवाई करण्यांत आली आहे. वाहतुक कोंडी करणाऱ्या एकूण ६ अवजड वाहनांवरील चालकांवर आरसीएफ पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १६१/२०१७, कलम २८३, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यांत आला आहे.

सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई यांनी दिनांक १९.०९.२०१७ रोजी तेल कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांच्या वाहनांमुळे वाहतुकीसंबंधीत निर्माण होणाऱ्या समस्यांबाबत

चर्चा केली. तसेच दिनांक ०९.१०.२०१७ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेसह तेल कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यांत आली. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून अवजड वाहनांच्या चालकांना टँकर भरण्यासाठी त्यांचा नंबर केव्हा येईल हे समजण्यासाठी व येणाऱ्या वाहनांची / चालकांची कागदपत्रे तपासण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचना तेल कंपन्यांच्या प्रतिनिधींना देण्यांत आलेल्या आहेत.

जड वाहनांकरीता एम/पुर्व महानगरपालिका वॉर्डातील भुखंडांचा वाहनतळ म्हणून विकसीत करण्यासाठी संबंधीत यंत्रणांशी / प्राधिकरणांशी पत्रव्यवहार करण्यांत आलेला आहे.
या प्रश्नावर प्रायोगिक तत्वावर उपाययोजना म्हणून ट्रॉम्बे वाहतूक विभाग हद्दीतील दहा रस्ते जड वाहनांना प्रतिबंधीत करण्यांत आले असून पाच रस्त्यांवर रस्त्याच्या एका बाजूस पार्किंग करीता परवानगी दिलेली आहे. त्यासाठी दिनांक २३.१०.२०१७ रोजी अधिसूचना निर्गमीत करण्यांत आलेली आहे.

बी.पी.सी.एल. व एच.पी.सी.एल. कंपनीची मालवाहू वाहनांकरीता स्थानिक बिल्डरच्या ताब्यात असलेल्या जमिनीवर पार्किंग लॉट तयार करण्याबाबत चर्चा सुरु आहे. सदरची चर्चा सफल झाल्यास पार्किंगची समस्या संपुष्टात येणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वन्नाक्राय या 'रॅन्समवेअर' व्हायरसने भारतासह अनेक देशांच्या संगणकावर हल्ला केल्याबाबत**

**(५) ८९०४९ (१२-०९-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतासह सुमारे १०० देशाच्या ७५ हजार संगणकावर वन्नाक्राय या 'रॅन्समवेअर' व्हायरसने हल्ला करण्याची घटना दिनांक १२ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सायबर हल्ल्याचा परिणाम राज्याच्या सुरक्षा व्यवस्थेवर कशाप्रकारे झाला आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही वा प्रतिबंधात्मक उपयोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१८) :** (१) होय.
(२) सदर सायबर हल्ल्यांच्या दरम्यान सुरक्षीचे उपाय योजना निश्चित केल्यामुळे राज्य शासनाच्या कार्यालयावर सायबर सुरक्षा व्यवस्थेवर परिणाम झाला नाही. राज्याने अशाप्रकारचे सायबर हल्ल्यापासुन सुरक्षित ठेवण्याकरिता सायबरसेल यंत्रणा राबविली असून अशा हल्ल्यांचा आधीच सुरक्षेचे उपाययोजनाबाबत अग्रीम सूचना देण्यात येत आहेत.
उदा. Malicious IP/Domain Block करणे, विशिष्ट प्रकारचे Attachments Block करणे (उदा), सायबर सेलबाबत जाणीव-जागृती इ. उपाय योजनाचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळामार्फत करण्यात आलेल्या मुंबईतील सर्व्हेक्षणात ९ उपकर प्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याबाबत

**(६) ९००८१ (०४-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळामार्फत पावसाळयापूर्वी करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणात मुंबईतील ९ उपकर प्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याचे माहे मे, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ९ इमारती कोणत्या आहेत तसेच सदर इमारतींतील रहिवाशांची शासनाने पर्यायी व्यवस्था केली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-०८-२०१८) :** (१) होय.

(२) (अ) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सन २०१७ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात ज्या ९ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत:-

१. इमारत क्र. १४४ एम जी रोड (एस्प्लेनेड मेंशन) अ-११६३

२. इमारत क्र.४४-४६ काझी स्ट्रिट/९०-९४-१०२,मस्जीद स्ट्रिट,

३. इमारत क्र.१०१-१११, बारा इमाम रोड,

४. इमारत क्र.१७४-१९०, १२५-१३३, के.एम.शर्मा मार्ग, मुंबई-०२, (गोपाळ निवास),

५. इमारत क्र.३०-३२,२ री सुतारगल्ली,

६. ३९, चौपाटी सी फेस

७. इमारत क्र.२०८-२२०, काझी सय्यद स्ट्रीट

८. इमारत क्र.५५-५७, नागदेवी क्रास लेन

९. ४६-५०, लकी मेंशन, क्लेअर रोड, भायखळा

वरील नऊ धोकादायक इमारतीतील २४७ (निवासी)+ २५३ (अनिवासी)= असे एकुण ५०० भाडेकरू/रहिवाशांपैकी ४५ भाडेकरू/रहिवाशी यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच १४५ भाडेकरू/रहिवाशांनी त्यांची पर्यायी व्यवस्था स्वत:च केली आहे. सदर अतिधोकादायक इमारतीमधील भाडेकरू/रहिवाशी यांना आवश्यकतेनुसार मंडळातर्फे जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आलेल्या असून त्यांचे गाळे खाली करून घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

या धोकादायक नऊ इमारतींच्या धोकादायक भागांना टेकु लावणे, धोकादायक भाग पाडणे, इ. कार्यवाही करण्यात आली असुन आवश्यकतेनुसार इमारतींच्या दुरूस्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच नऊ धोकादायक इमारतींपैकी ४ इमारती पूर्णत: रिक्त करून घेतल्या आहेत.

(ब) मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत सन २०१८ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात खालील ७ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आलेल्या आहेत :-

१. इमारत क्र. १४४ एम जी रोड (एस्प्लेनेड मेंशन) अ-११६३
२. इमारत क्र.२०८-२२० काझी सय्यद स्ट्रिट,
३. इमारत क्र.१०१-१११, बारा इमाम रोड,
४. इमारत क्र.३०-३२,२ री सुतारगल्ली,
५. इमारत क्रं. ६९-८१, खेतवाडी, ३ री गल्ली, गणेश भुवन
६. ३९, चौपाटी सी फेस
७. ४६-५०, लकी मेंशन, क्लेअर रोड, भायखळा

वरील सात धोकादायक इमारतीमध्ये मागील वर्षी अतिधोकादायक जाहीर केलेल्या ६ इमारतींचा समावेश आहे. या अतिधोकादायक इमारतींमध्ये २१४ (निवासी) + १८९ (अनिवासी) = असे एकुण ४०३ भाडेकरू / रहिवाशी आहेत. या इमारतींपैकी १ इमारतीस पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. १११ भाडेकरू / रहिवाशांनी त्यांची इतरत्र पर्यायी व्यवस्था स्वत:च केली आहे. आतापर्यंत २ भाडेकरू / रहिवाशी यांना संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत अतिधोकादायक इमारतीमधील भाडेकरू/ रहिवाशी यांना आवश्यकतेनुसार मंडळातर्फे जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात येतील व त्यांची पर्यायी व्यवस्था संक्रमण शिबिरात करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकिय सेवेतील २७१ कर्मचाऱ्यांच्या निलंबनाबाबत**

**(७) ९६२४० (०६-०१-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनातील शासकिय सेवेतील २७१ कर्मचाऱ्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) नागपूर विभागातील लाचलुचपत विभागाच्या परिक्षेत्रानुसार निलंबित न करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांची सर्वाधिक संख्या नागपूर परिक्षेत्रात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी अधिका-यांच्या निलंबनाबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१८) :** (१) राज्यातील विविध परिक्षेत्रातील सापळा प्रकरणात कारवाई करण्यात आलेल्या एकुण २५१ लोकसेवकांना निलंबित करण्यात आलेले नाही. याबाबत कारवाई करण्याची जबाबदारी संबंधीत विभागाची आहे. तसेच काही लोकसेवकाची त्या विभागाकडून बदली करण्यात आलेली आहे. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०५.०१.२०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये सापळा कारवाई मध्ये सापडलेल्या लोकसेवकास तात्काळ निलंबीत करण्याच्या सुचना सर्व विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

(२), नागपुर परिक्षेत्रात २१ लोकसेवकास निलंबीत करण्यात आलेले नाही. त्यांच्यावर संबधीत विभागाने कारवाई केली आहे.

(३) व (४) राज्यातील सापळा प्रकरणामध्ये अडकलेल्या कोणत्याही लोकसेवकास जनतेत चांगला संदेश जाण्याचा दृष्टीने तात्काळ निलंबित करण्यात यावे, अश्या सुचना दिनांक ०५.०१.२०१८ रोजी मा.मुख्य सचिव, यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये सर्व विभागांना देण्यात आलेल्या आहेत.

---

**पोलीस दलातील कर्मचा-यांच्या पदोन्नतीसाठी पोलीस मॅन्युअल प्रमाणे दरवर्षी परिक्षा घेण्याबाबत**

**(८) ९६७०३ (०६-०१-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस दलात कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचा-यांच्या पदोन्नतीसाठी सन १९९५ पासुन ते २०१६ पर्यंत सुमारे २१ वर्षात केवळ सन २००२ व सन २०१३ मध्ये खात्यामार्फत परिक्षा घेण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, पोलीस मॅन्युअल प्रमाणे दरवर्षी परिक्षा घेवून पदोन्नती देण्याची तरतूद असतानाही कार्यवाही न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, पोलीस मॅन्युअलची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) होय, सन २०००,सन २००२ व सन २०१३ मध्ये विभागीय अर्हता परिक्षा घेण्यात आल्या आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३), (४) व (५) पोलीस विभागातील पोलीस उप निरिक्षकांची एकूण ९६८७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २४२२ पदे स्थानापन्न (अर्हता) (२५%) कोट्यातील आहे. सदरची रिक्त (सेवानिवृत्तीने/अन्य कारणाने) होणारी पदे ही विभागीय अर्हता परिक्षा घेऊन भरली जातात. परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या सर्वच उमेदवारांना पोलीस उप निरिक्षक पदावर सामावून घेणे शक्य नाही. त्यामुळे सन २००१ ते २०१२ पर्यंत वर्षनिहाय रिक्त होणाऱ्या पोलीस उप निरीक्षक पदांवर पदोन्नती देण्यात आली आहे.

शासनाच्या दि.२९/६/२०१३ मधील तरतुदींनुसार सन २०१३ मध्ये विभागीय अर्हता परिक्षा आयोजित करण्यात आली होती. सदर परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या पोलीस शिपाई भरती दिनांकाच्या सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीच्या रिक्त पदावर माहे ऑक्टोबर, २०१३ व जुलै,२०१४ या कालावधीत एकूण १९०७ उमेदवारांना पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली होती. सदर परिक्षेविरुध्द काही उमेदवारांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे

मूळ अर्ज क्र.७६७/१३ व २८४/१४ दाखल केले असून, त्यामधील उमेदवार प्रदीप मुरलीधर सोनवणे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल होती. त्यास अनुसरुन मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१२/१/२०१५ च्या अंतरिम आदेशांनुसार Status-quo (जैसे थे) चे आदेश दिले होते. शासनाने देखील मा. न्यायाधिकरण यांच्या आदेशाविरुध्द याचिका क्र.४०७८/२०१५ मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केली होती. मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई यांनी शासनाच्या बाजूने निर्णय दिलेला आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने सन २०१६ पर्यंत रिक्त असलेल्या पदांवर पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.

---

**महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटना यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(९) १००४९५ (०६-०१-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघटना यांच्या प्रलंबित मागण्यांवर विचार करण्याकरिता दिनांक १० जुलै, २०१४ रोजी सचिव, विशेष गृह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत पोलीस पाटलांना रुपये ३०००/- मानधन वाढवून रुपये ७५००/- इतके करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळ बैठकीसमोर सादर करण्यात यावा असे आश्वासन देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संघटनेच्या दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ रोजी नागपूर रेशिमबाग मैदानावर झालेल्या राज्यव्यापी मेळाव्यात मा. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या मागण्यांवर दोन महिन्यात निर्णय घेतो असे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानंतर दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजी याच अनुषंगाने झालेल्या बैठकीत मानधन वाढीचा प्रस्ताव २ आठवड्यात वित्त विभागास सादर करावा असे लेखी आश्वासन देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जबाबदार अधिक-यांसोबत दिनांक १० जुलै, २०१४ आणि दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजी या दोन तारखांना झालेल्या महत्वपूर्ण बैठकीत एकाच विषयावर दोन वेगवेगळी आश्वासने देण्याची करणे काय आहेत,

(५) असल्यास, पोलीस पाटीलांचे मानधन वाढीसंदर्भात तसेच नियमत कर्मचारी या वेतन श्रेणीत समाविष्ट करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पोलीस पाटीलांच्या मानधन वाढविण्याबाबत निर्णय घेण्यांत येईल तसेच इतर मागण्यांबाबत शासन सकारात्मक विचार करेल असे आश्वासन देण्यांत आले होते.

(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) पोलीस पाटील, कोतवाल, अंगणवाडी सेविका इ. मानसेवी कर्मचाऱ्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८.०३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये एक अभ्यासगट नेमण्यांत आला आहे. सदर अभ्यासगटाने अंतीम अहवाल शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे. शिफारशी प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने पोलीस पाटलांच्या मानधन व अन्य सोयीसवलतींबाबत गृह विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यांत येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयातील पोलीस उपनिरीक्षक यांची रिक्त पदे भरण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(१०) १०११७४ (०६-०१-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयातील पोलीस उपनिरीक्षक यांची रिक्त पदे भरण्यास विलंब होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधीनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १७ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१८) :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक यांची ९६८७ पदे मंजूर असून २०९९ पदे रिक्त आहेत. भंडारा जिल्हयात ७० पदे मंजूर असून २९ पदे रिक्त आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरती प्रक्रिया सुरु असून सदर अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर भंडारा जिल्हयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयातील शेतक-यांना शासकीय योजनेचा लाभ मिळण्यासाठी गतीमान इंटरनेटची सेवा उपलब्ध करून देण्याबाबत**

**(११) १०२०६२ (०६-०१-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील शेतक-यांना शासकीय योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासकीय कर्मचारी अथवा नेमुन दिलेल्या एजंन्सी मार्फत ऑनलाईन अर्ज करण्यासाठी बिएसएनएल ची इंटरनेट सेवा वापरण्यात येते, परंतु बीएसएनएल ची सेवा गतीमान नसल्यामुळे शेतकरी शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय योजनेचा लाभ प्रत्येक लाभार्थ्याला मिळण्यासाठी इंटरनेटची सेवा गतीमान होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१८) :** (१) नाही, हे खरे नाही.
(२) शासकीय योजनेचा लाभ गावपातळीपर्यंत पोहचण्याकरिता शासनामार्फत महानेट प्रकल्पाद्वारे फायबर नेटवर्कचे जाळे उभारुन सेवा गतीमान करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई गोरेगाव (प) येथिल खाना खजाना (तकीला बार) बारवर व त्याच्या मालकावर कारवाई करण्याबाबत

**(१२) १०२८७४ (०६-०१-२०१८). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोरेगाव (प.) येथे रतीकृष्णा पटनायक (सोनू) यांच्या मालकीच्या खाना खजाना (तकीला बार) पहाटे ३ ते ४ वाजेपर्यंत सुरु असते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तकीला बार मध्ये ४ गायक मुलींची परवानगी असताना त्या बार मध्ये २५ ते ३० मुली असल्याचे निदर्शनास येते तसेच या बारमध्ये अल्पवयीन मुली राहत असून या बार मालकाला स्थानिक प्रशासन मदत करत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या हॉटेल मालकावर मुंबई मध्ये डी.बी.मार्ग, ग्रांटरोड पूर्व, तसेच काशिमिरा पोलीस स्टेशन मिरारोड येथे पीटा अंतर्गत गुन्हा दाखल असून बांगुरनगर पोलीस स्टेशन गोरेगाव पश्चिम व विविध ठिकाणी १८ क्रिमीनल केसेसही दाखल आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर बारवर व बार मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०१८) :** (१) व (२) खाना खजाना (तकीला बार) या बारवर बांगुरनगर पोलीस ठाणे यांनी तेथील नियमबाह्य बाबींकरीता वेळोवेळी कारवाई केली असून आतापर्यंत एकूण ०७ गुन्हयांची नोंद केली आहे. तथापि, या बारमध्ये नाबालिक मुली राहत असल्याचे आढळून आलेले नाही.
(३), (४) व (५) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील बांगुरनगर पोलीस ठाणे व डॉ.दा.भ.मार्ग पोलीस ठाणे यांनी रतीकृष्णा पटनायक व त्यांच्या मालकाचे खाना खजाना (तकीला बार) या बारवर आतापर्यंत १० गुन्हयांची नोंद केलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पनवेल (जि.रायगड) महानगरपालिका आयुक्त यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याबाबत

**(१३) १०६१८८ (१२-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) महानगरपालिका आयुक्त श्री.सुधाकर शिंदे यांना दिनांक ३० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार पालिका आयुक्तांना संरक्षण देण्याच्या दृष्टिने कोणती उपाययोजना करण्यात आली आहे तसेच या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) व (२) होय. सदर प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमा विरोधात पब्लीक एन.सी. नंबर २१०५/२०१७, भादंवि ५०७ प्रमाणे अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला. मा.आयुक्त, महानगर पालिका यांना पनवेल शहरपोलीस ठाण्यातून कार्यालयीन वेळेत १ सशस्त्र पोलीस कमर्चारी संरक्षणार्थ पुरविण्यात आला होता. महानगरपालिका आयुक्तांची बदली झाल्याने त्यांचे पोलीस संरक्षण बंद करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अहमदनगर येथे विस्तार अधिका-यास व हवालदारास लाच घेताना पकडल्याबाबत

**(१४) १०६५६० (१२-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथे ग्रामसेवकाच्या निलंबन काळातील कार्यवाहीसाठी रुपये १५ हजारांची लाच स्विकारताना विस्तार अधिका-यास जिल्हा परिषद नाशिक येथील पथकाने तसेच अटकपूर्व जामिनावर आपले म्हणणे मांडण्यासाठी रुपये ५ हजार स्विकारताना भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील हवालदारास जीपीओ चौकात नगर येथील पथकाने दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास पकडल्याचे उघड झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या दोन्ही प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१८) :** (१) होय.

दि. १६.०१.२०१८ रोजी आरोपी श्री.विजय निवृत्ती चराटे, विस्तार अधिकारी ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परीषद अहमदनगर यांनी तक्रारदार श्री.भांड यांचेकडून सेवा निलंबन कालावधीचा निर्णय घेण्यासाठी लाचेची मागणी करून ती स्वीकारल्यामुळे त्यांचेवर लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ कलम ७, १३(१)(ड), सह १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. तसेच आरोपी लोकसेवक पोलीस हवालदार श्री. दिलीप रामकृष्ण तिकोणे, नेमणुक भिंगारकॅम्प पोलीस स्टेशन, अहमदनगर यांनी तक्रारदारांचे विरुध्द दाखल गुन्ह्यात मा. न्यायालयातुन घेतलेल्या तात्पुरत्या अटकपुर्व जामीनावर म्हणणे सादर करण्यासाठी रु. ५००० दि.१७.०१.२०१८ रोजी स्वीकारले असल्यामुळे त्यांचेविरुध्द कोतवाली पो.स्टे. जि.अ.नगर गुरनं ३०१०/२०१८ लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड), सह १३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२), (३) व (४) आरोपी लोकसेवक श्री. विजय निवृत्ती चराटे, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत विभाग जिल्हा परिषद अहमदनगर व आरोपी श्री. दिलीप तिकोणे यांचे विरुध्द गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरू आहेत.

---

**राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत**

**(१५) १०७०९३ (०७-०४-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय कदम (दापोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबतचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत पदवीधर अंशकालीन कर्मचारी संघटनेने लोकप्रतिनिधींमार्फत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे गत ५ वर्षापासून सतत मागणी करीत असून दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनही दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-०८-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) राज्यातील पदवीधर अंशकालीन उमेदवारांचा मागील १५ वर्षापासून प्रलंबित प्रश्न निकाली काढण्याकरिता तसेच अंशकालीन उमेदवारांना विशेष बाब म्हणून कंत्राटी तत्वावर नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्याचे धोरण ठरविण्याकरिता शासन निर्णय दि. १६.२.२०१८ अन्वये एक समिती गठीत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील पोलीस दलात महिला पोलीस कर्मचा-यांची कमतरता असल्याबाबत**

**(१६) १०७१७१ (११-०४-२०१८). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला अत्याचाराचे गुन्हे वाढत असताना राज्यातील पोलीस दलात फक्त १२.८४ टक्केच महिला पोलीस कर्मचारी असल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक पोलीस ठाण्यात तपास करण्यासाठी बाहेरील पोलीस ठाण्यातून महिला अधिकारी बोलविण्याची वेळ येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी येणाऱ्या महिलांना अनुकूल वागणूक मिळावी, यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात दोन महिला पोलीस अधिकारी आणि सहा महिला पोलीस शिपायांची नेमणूक करण्याच्या सूचना गृह विभागाने सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षकांना दिल्या असतानाही अनेक ठिकाणी महिला पोलीसांची कमतरता असल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिलांवरील अत्याचारांच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांनी मध्यंतरीच्या काळात सात कलमी कार्यक्रम हाती घेतला असून त्यातील अनेक बाबी या कागदावरच असल्याचे कळते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने पोलीस दलातील महिला पोलीस दलातील कर्मचा-यांत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

राज्य पोलीस विभागात सद्यस्थितीत एकुण २,०७,९७८ पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी १,६७१ महिला पोलीस अधिकारी व २५,९२३ महिला पोलीस कर्मचारी अशा एकुण २७,५९६ इतक्या महिला पोलीस अधिकारी /कर्मचारी कार्यरत आहेत.

(३) हे खरे नाही.

पोलीस ठाण्यांमध्ये तक्रार नोंदविण्यासाठी येणाऱ्या महिलांच्या तक्रारीची सन्मानपुर्वक तात्काळ दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत राज्यातील सर्व गट पोलीस प्रमुख, शाखा प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना सुचीत करण्यासाठी पोलीस महासंचालक, मुंबई यांच्या दि.४.७.२०१७ च्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधिक्षक यांना कळविण्यात आले आहे. राज्य पोलीस विभागातील सर्व मुख्यालयांच्या ठिकाणी महिला सहाय्य कक्षाची तसेच सर्व पोलीस ठाण्यांमध्ये स्वतंत्र महिला कक्षाची स्थापना करण्यात आली असून, तेथे पोलीस निरीक्षक/सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक दर्जाच्या महिला अधिकारी, पाच महिला पोलीस कर्मचारी आणि दोन पुरुष कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) महिला अत्याचार थांबविण्यासाठी शासनाकडून खालील योजना सुरु करण्यात आल्या आहेत-

१. महिला अत्याचार प्रतिबंध कक्ष

२. महिला सहाय्य कक्ष (जिल्हा स्तरावर)

३. महिला सुरक्षा समिती (जिल्हा स्तरावर)

४. बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांचा तपासासाठी मार्गदर्शक सूचना

५. हुंडाबळीकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना

६. छेडछाड व विनयभंगाच्या घटना रोखण्यासाठी योजना

७. कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैगिक शोषणाकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना

८. महिला व मुलींच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना

९. महिला विशेष समुपदेशन केंद्रे

१०. स्त्री भ्रूण हत्या रोखण्याकरीता केलेल्या योजना

११. कौटुंबिक हिंसाचार कायदा

१२. सी.सी.टी.एन.एस. व नवीन ॲप्स सुरु केले

१३. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणा-या महिलांच्या सुरक्षेच्या उपाययोजना

वरील योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु असून सदर योजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलबध करुन देण्यात आले आहे.

(५) शासन निर्णय, महिला व बालकल्याण विभाग, दि.२५.५.२००१ नुसार सर्व पोलीस घटक कार्यालय पोलीस भरतीमध्ये ३०% आरक्षणानुसार महिलांना प्राध्यान्य देवून महिला पोलीसांची भरती करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जोगेश्वरी (मुंबई) येथील नित्यानंद बारमध्ये अनैतिक धंदे सुरु असल्याबाबत**

**(१७) १०७५१३ (२७-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील जोगेश्वरी येथील नित्यानंद बारमध्ये बारबाला व अनैतिक धंदे सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या बारमध्ये अवैध बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) यासंदर्भात संबंधित आस्थापनेतील चालक, व्यवस्थापक, कॅशियर, वेटर व ग्राहक अशा एकूण ३२ जणांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच सदर आस्थापनेमध्ये अवैधरित्या केलेले बांधकाम, बार मालक यांचेकडून निष्कासित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सरकारी विभागांचा डेटा क्लाऊडवर साठवण्याचे धोरण राबविण्याबाबत**

**(१८) १०८२५६ (१८-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वच सरकारी विभागांचा डेटा क्लाऊडवर साठवण्याचे धोरण राबविण्यात येत असल्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी एका कार्यक्रमाप्रसंगी माहिती दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्लाऊड स्टोअरेज मध्ये डेटा कोणालाही हवा असल्यास विनाशुल्क देण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, क्लाऊडचे सर्वसाधारण धोरण काय व त्याअनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०८-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) शासनाने दि.२९/०१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये क्लाऊडचे धोरण निर्गमित केले आहे. तसेच दि.१९/०५/२०१८ च्या शासन निर्णयान्वये क्लाऊड सेवा देणाऱ्या संस्थांची यादी, मार्गदर्शक सूचना व त्यांचे दर निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर जिल्हयातील पोलिसांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१९) ११०३८९ (११-०४-२०१८). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

अ.ता.प्र.क्र. ५१३४९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात

(१) पालघर जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर दिनांक १४ जानेवारी, २०१५ रोजीच्या शासन आदेशान्वये २५३ पदांना मंजुरी देण्यात येऊन तसेच पोलीस शिपाई संवर्गातील माहे ऑगस्ट, २०१६ पर्यंत रिक्त होणाऱ्या ३६६ पदांपैकी २७५ पदे भरण्यासंबंधीची भरती प्रक्रिया पूर्ण होऊन पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यासंबंधीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) तसेच, माहे ऑगस्ट, २०१६ ते डिसेंबर २०१७ पर्यत पालघर पोलीस दलात सेवानिवृत्त व अन्य बाबींमुळे प्रत्यक्षात किती पदे रिक्त झाली आहेत व ती पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०८-२०१८) :** (१) सन २०१५-१६ मध्ये २७५ पोलीस शिपाई पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करुन सदर उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

(२) व (३) माहे ऑगस्ट २०१६ ते डिसेंबर २०१७ पर्यंत पालघर पोलीस दलात सेवानिवृत्त व अन्य बाबीमुळे १६० पदे रिक्त होती. सन २०१७ मध्ये १५९ पदांची भरती प्रक्रिया घेण्यात आली आहे व सन २०१८ मध्ये पोलीस शिपाई या संवर्गासाठी १६९ उमेदवारांची भरती प्रक्रिया घेण्यात आली आहे.

---

### यवत (ता.दौंड, जि.पुणे) पोलीस स्टेशन ला जागा मिळणेबाबत

**(२०) ११०५८१ (०५-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका दौंड (जि. पुणे) येथील पोलीस स्टेशन सन १९८० मध्ये वा त्यादरम्यान रुपांतर झालेल्या यवत पोलीस स्टेशनला पोलीस कर्मचारी निवासस्थाने, संचालन मैदान व अपघात व कार्यवाहीत पकडलेली वाहने लावण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने पोलीस स्टेशनला जागा मिळावी अशी मागणी येथील पोलीस अधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, निवासस्थाने उपलब्ध नसल्याने या ठिकाणचे अधिकारी इतरत्र राहत असल्यामुळे आपतग्रस्त परिस्थितीत या ठिकाणी कर्मचारी उपलब्ध होत नसल्याची बाब अनेक वेळा उघडकीस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत, ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत जागा देणेबाबत ठराव मंजूर करण्यात आला आहे तसेच लोकप्रतिनिधीनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जागा मिळणेबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलीस स्टेशनला जागा उपलब्ध करून देणेबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०७-२०१८)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) केडगाव ग्रामपंचायतीच्या दिनांक ०१/०५/२०१७ रोजीच्या ग्रामसभेत पोलीस ठाणे, यवतकरिता जागा देण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला आहे.

यासंदर्भातील स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ०७/११/२०१७ चे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.
(४) पोलीस ठाणे, यवत येथील पोलीस कर्मचाऱ्यांकरिता निवासस्थाने, संचालन मैदान तसेच, अपघात व कार्यवाहीत पकडलेली वाहने लावण्यासाठी जागा मिळण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयाकडून जिल्हाधिकारी, पुणे यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून गत १० वर्षांत पोलिसांवर कारवाई करण्याचे प्रमाण कमी झाले असल्याबाबत

**(२१) १११६४३ (०७-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सन २००७ पासून १ पोलीस उप अधिक्षक दर्जाचा अधिकारी, ६ पोलीस निरीक्षक, ७ सहाय्यक पोलीस निरीक्षक, १२ पोलीस उपनिरीक्षक आणि २३ पोलीस हेडकॉन्स्टेबलवर कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १० वर्षांत पोलीसांवरील कारवाईचे प्रमाण कमी झाले असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कारवाईत दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सक्षम करून आरोपींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१८)** : (१) हे खरे नाही, तथापी लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सन २००७ ते सन २०१७ आखेर पर्यंत पुणे परिक्षेत्रातील एकुण ३३५ सापळा केसेस करण्यात आलेल्या असुन त्यामध्ये २ डि.वाय.एस.पी, १९ पोलीस निरीक्षक, ७७ पोलीस नाईक, ४१ पोलीस शिपाई एवढ्या आरोपी लोकसेवकांवर कार्यवाही करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील प्रत्येक पोलीस स्टेशनला पासपोर्टसाठी टॅब चे वाटप करण्यात आल्याबाबत**

**(२२) १११७१६ (०७-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील प्रत्येक पोलीस स्टेशनला पासपोर्टसाठी लागणारी पोलीस पडताळणी वेळेत होण्याकरिता टॅब चे वाटप माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संगणक प्रणालीचा वापर केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, यामुळे कोल्हापूर जिल्ह्यातील किती नागरिकांना याचा फायदा झाला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) कोल्हापूर जिल्ह्यातील ३१ पोलीस ठाणेपैकी २० पोलीस ठाण्यांमध्ये दि. २४.०२.२०१८ रोजी पासून एम- पासपोर्ट या संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. तसेच उर्वरित पोलीस स्टेशनसाठी सदर साधन सामुग्री उपलब्ध करून देऊन कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) कोल्हापूर जिल्ह्यातील २० पोलीस ठाणे अंतर्गत एकूण ५६०२ नागरिकांनी या संगणक प्रणालीचा फायदा घेतलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई येथील जुन्या चाळी व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाबाबत**

**(२३) ११२३६४ (०३-०४-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील बी.डी.डी चाळींचा पुन विकास व ५०० फुटांचे स्वतंत्र घर या निर्णयाच्या पार्श्वभुमीवर जुन्या चाळी व धोकादायक इमारतींचा पुनर्विकास व भाडेकरुंना ५०० फुटांचे स्वतंत्र घर याची मागणी होत असल्याची बाब माहे जुन, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या दरमयान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चाळींबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास निवेदनाच्या माध्यमातून पत्रव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२८-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त/ बिगर उपकरप्राप्त इमारतींशी निगडीत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासनास सुचना करण्याकरीता दि.२९.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये

८ विधानसभा/ विधानपरिषद सदस्यांची समिती गठीत करण्यात आली आहे. त्यानुषंगाने मा. विधानसभा/ विधानपरिषद सदस्यांनी शासनास विविध शिफारशी सादर केल्या असून सदर शिफारशींमध्ये उपकरप्राप्त इमारतीमधील रहिवाशांना ५०० चौरस फुटाचे घरे देण्यात यावे या शिफारशीचा समावेश आहे. समितीमधील सदस्यांनी सादर केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने समितीचा अहवाल तयार करण्यात आला असून त्यातील शिफारशींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिंगोली शहराच्या जुन्या पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२४) ११२५६३ (०७-०४-२०१८). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली)** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली शहराच्या मध्यभागी असलेल्या जुन्या पोलीस वसाहतीची मागील अनेक वर्षापासून दुरवस्था झाली असून पावसाळ्यामध्ये तेथील खोल्यांमध्ये गळती होते व राहण्याची जागाही अपुरी पडत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या वसाहतीची दुरुस्तीही केली जात नसुन तेथे राहणा-या पोलीस
कर्मचा-यांकडून नियमीत भाडे वसूल केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर वसाहतीची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०८-२०१८) :** (१), (२) व (३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेळोवेळी शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्तीची कामे केली जातात.

हिंगोली शहरात २०० नवीन पोलीस सेवा निवासस्थाने यांचे बांधकाम करण्याबाबतच्या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक केली असून प्रकल्प नियोजन स्तरावर आहे.

शासकीय निवासस्थानात राहत असल्याने पोलीस कर्मचाऱ्यांकडून नियमाप्रमाणे अनुज्ञप्ती शुल्क घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्ह्यातील पोलीस अधीक्षक कार्यालयात कनिष्ठ लिपिकास लाच स्वीकारतांना अटक केल्याबाबत**

**(२५) ११२९६६ (१२-०४-२०१८). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील एका प्रकरणात पोलीस अधीक्षक कार्यालयात कनिष्ठ लिपिकास लाच स्वीकारतांना अटक करण्यात आल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) आरोपी लोकसेवक रमेश रामा गायकवाड कनिष्ठ लिपिक, पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड यांनी तक्रारदार यांचे विरूध्दच्या प्राथमिक चौकशीचा अहवाल पत्रव्यवहार शाखेत पाठविण्यासाठी लाचेची मागणी करून ती स्विकारली म्हणुन त्यांना अटक करण्यात आली आहे. आरोपीविरुध्द पोलीस ठाणे वजिराबाद येथे गुर.क्र. ०७/२०१८ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ कलम ७,१३ (१) (ड.) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला अहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.

---

## नाशिक शहरात वाहन चोरीचे वाढते प्रमाण

**(२६) ११३२४४ (११-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात वाहन चोरांचे प्रमाण वाढले असून पंचवटी परिसरातून रिक्षा व इंदिरा नगर परिसरातून तीन दुचाकी चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना दिनांक २८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, घडली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरात मोठ्या प्रमाणात वाहन चो-या होऊन पोलीस यंत्रणेकडून याबाबत कोणतीच प्रभावी कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक शहरातील वाहन चोरी करणा-या टोळीला अटक करुन त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच वाहन चोरीला प्रतिबंधीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
तथापि दि.२९.०१.२०१८ रोजी पाथर्डी फाटा नाशिक येथून होंडा ॲक्टीव्हा गाडी चोरीस गेल्याप्रकरणी भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणी एका आरोपीस अटक करून गुन्हयातील चोरीस गेलेली मोटार सायकल आरोपीताकडून हस्तगत करण्यात आलेली आहे.
(२) नाशिक शहरात माहे जाने.२०१७ मध्ये व माहे जाने,२०१८ मधील चोऱ्यांबाबतची माहीती :-

| अ.क्र. | हेड | जानेवारी २०१७ | | | जानेवारी २०१८ | | | वाढ/ घट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | टक्के | दाखल | उघड | टक्के | |
| १ | मो.सा.चोरी | ४१ | १० | २४% | ४६ | ०५ | ११% | ५ |
| २ | इतर चोरी | ३६ | ०८ | २२% | १९ | ०६ | ३२% | -१७ |

(३) नाशिक पोलिस आयुक्तालयातील पोलीस स्टेशन हद्दीतील वाहन चारीच्या घटनांना प्रतिबंध घालणेकामी नाकाबंदी, झोपडपट्टी चेकिंग, पायी पेट्रोलिंग, सराईत गुन्हेगारांवर लक्ष ठेवणे, जनतेशी संपर्क साधून सतर्कतेच्या सुचना देण्यात येतात. गुप्त बातमीदारांमार्फत रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर पाळत ठेवून प्रतिबंध कारवाई करण्यात येते. वाहन चोरीसंदर्भात नाकाबंदी मध्ये नंबर प्लेट, चेसीज, इंजिन नंबर, नंबर प्लेट तपासणी करणेबाबत सुचना देण्यात येतात.

वाहन खरेदी विक्री करणाऱ्या बाजारांना अचानकपणे भेटी देवून विक्रीसाठी आलेल्या वाहनांच्या कागदपत्रांची तपासणी केली जाते.

गॅरेज चालकांना चोरीचे अगर संशयित वाहन आल्यास त्याबाबत त्वरीत माहिती देण्याच्या, डुप्लिकेट चावी बनविणारे/नंबर प्लेट तयार करणारे यांना मोटार वाहन मालकांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. वाहन चोरी घडलेल्या ठिकाणांचा डम डाटा प्राप्त करून त्याचे विश्लेषण करून गुन्हे उघडकीस आणण्याचे सर्वोतोपरी प्रयत्न केले जातात.

(४) विलंब झालेला नाही.

---

**आंबेठाण (ता.खेड, जि.पुणे) गावाच्या हद्दीत सोळबन येथील जमिनीवर स्वस्तात घरे देण्याच्या आमिषाने लोकांची केलेली फसवणुक**

**(२७) ११४२२३ (११-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेठाण (ता.खेड, जि.पुणे) गावाच्या हद्दीत सोळबन येथील सरकारी जमिनीवर स्वस्तात घरे देण्याचे आश्वासन देऊन अनेक लोकांची फसवणूक केल्याचा प्रकार माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत चाकण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने प्रशासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) अशा प्रकारची तक्रार / गुन्हा दाखल नाही.

(२) हे खरे नाही, सदर प्रकरणाबाबत चाकण पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथे व्हिनस टूर्सच्या संचालकांकडून नागरिकांची केलेली कोट्यवधी रुपयांची फसवणुक**

**(२८) ११४७९९ (१४-०४-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे व्हिनस टूर्सच्या संचालकांकडून देशात तसेच परदेशातील टूर्सच्या नावाखाली पैसे घेवून टूर रद्द झाल्याचे संदेश पाठवून स्वीकारलेली रक्कम परत करण्यासाठी न वटणारे धनादेश देवून फसवणुक केल्याचा प्रकार माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केरळ आणि युरोप सहलीच्या नावाखाली नाशिकमधील श्री.संजय दिघे आणि प्रविण साबळे या दोन कुटुंबियांची लाखो रुपयांची फसवणूक सदर कंपनीने केल्याच्या तक्रारी सरकारवाडी पोलीस स्थानकात माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारींच्या अनुषंगाने व्हिनस टुर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स कंपनीचे संचालक श्रीमती लता आणि श्री.विष्णू सानप या कंपनी संचालकावर फसवणूक, अपहाराचे गुन्हे पोलीसांनी दाखल केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, व्हिनस टूर्सच्या संचालकांनी जळगांव, नगर, नाशिक जिल्ह्यातील नागरिकांना कोपरगाव येथील काकडी शिवारात प्लॉट देतो असे अमिष दाखवित नागरिकांकडून कोट्यवधी रुपये जमा करुन फसवणुक केली हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१), (२) व (३) व्हिनस टुर्स प्रा. लि. या कंपनीच्या संचालकांनी परदेशातील टुर्सची माहिती देवून, त्यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादीकडून रु. १०,३०,०००/- इतकी रक्कम वेळोवेळी आरोपीच्या खात्यात आरटीजीएस द्वारे स्विकारली आणि त्यानंतर सदरची टूर्स रद्द झाल्याचे संदेश पाठवून स्विकारलेली रक्कम परत करण्यासाठी न वटणारे धनादेश देवून फसवणुक केल्याने सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. ३५/१८ भा.दं.वि.कलम ४२०,४०९,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून उक्त आरोपींना मा. न्यायालयाने जामिन मंजुर केलेला आहे.

त्याचप्रमाणे सदर कंपनीने संजय दिघे यांना केरळ टूर्सची माहिती देवून त्यांचेकडून रु. २,००,०००/- इतकी रक्कम घेतली व टूर रद्द झालेचे कळवून स्विकारलेल्या रक्कमेतील ५०,०००/- रुपये परत केले व उर्वरीत रक्कम स्वतःच्या फायद्याकरीता वापरले वरून सरकारवाडा पोलीस स्टेशन येथे गु. र. नं. ३७/१८ भा.दं.वि.कलम ४२०,४०९,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(४) याबाबत कोणतीही तक्रार / गुन्हा दाखल नाही.

(५) उक्त गुन्ह्याच्या अनुषंगाने दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर दोन्ही गुन्हे पोलीस तपासावर आहेत.
(६) विलंब झालेला नाही.

---

**पातूर ते अकोला, आलेगाव, मळसूर, चान्नी, वाडेगाव, बाळापूर, मालेगाव धाबा, महान (जि.अकोला) या मार्गावरील अवैध वाहतुकीबाबत**

**(२९) ११४९१९ (११-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पातूर ते अकोला, आलेगाव, मळसूर, चान्नी, वाडेगाव, बाळापूर, मालेगाव धाबा, महान (जि.अकोला) या मार्गावर अवैध वाहतुक होत असल्याचे व काळी-पिवळीतून क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक होत असून देखील प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे दूर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चान्नी येथील पोलीस ठाण्याच्या समोरच क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी वाहतूक केली जाते, हे ही आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषी असणा-यांवर कारवाई करण्याबाबत तसेच या अवैध वाहतूकिला प्रतिबंधीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१८) :** (१) पातूर ते अकोला, आलेगांव, मळसूर, चान्नी, वाडेगांव, मालेगांव धाबा, महान इ. मार्गांचा समावेश असलेल्या बाळापूर उपविभाग हद्दीमध्ये माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या कालावधीत अवैध प्रवासी वाहतूकीच्या ३३ केसेस करण्यांत आला असून त्यांचेकडून रु.१२,०००/- इतका दंड वसूल करण्यांत आला आहे. यापैकी १२ केसेस काळी पिवळी टॅक्सीविरुध्दच्या आहेत.
(२) माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या कालावधीत चान्नी पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोटार वाहन कायद्यान्वये ५९ केसेस करण्यांत येऊन त्यान्वये रु.१३,६००/- दंड वसूली करण्यांत आली आहे तर एका अवैध प्रवासी वाहतूक केस प्रकरणी रु. २,०००/- दंडवसूली करण्यांत आली आहे. चान्नी पोलीस ठाणे समोर तसेच हद्दीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक होणार नाही याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यांत आल्या आहेत.
(३) माहे जानेवारी ते मार्च, २०१८ या कालावधीत अकोला जिल्ह्यामध्ये अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरुध्द ११८७ केसेस करण्यांत आल्या असून रु. ११.३९ लाख इतका दंड वसूल करण्यांत आला आहे. मोटार वाहन कायद्याचे वारंवार उल्लंघन करणारे तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या वाहनांचा आढावा घेऊन त्याप्रमाणे २० वाहन निलंबनाची कारवाई करण्यांत आली आहे.

यात्व्यतिरिक्त पुढील कार्यवाही करण्यांत येत आहे :-

परिवहन महामंडळ व पोलीस यांचे संयुक्त मोहिमेद्वारे २८ वाहनांविरुध्द कारवाई करुन सदर वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या ताब्यात देण्यात आलीअवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांवर वेळोवेळी विशेष मोहिम राबवून कारवाई करण्याबाबतच्या सूचना उपविभागीय स्तरावर देण्यांत आल्या आहेत

मोटार वाहन कायद्याचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहनांचा आढावा घेऊन वाहन निलंबन प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे

वाहतूक पोलीस व स्थानिक अशासकीय संस्था यांचे मदतीने अवैध प्रवासी वाहतूकीचे दुष्परिणाम व त्याबाबत माहितीपत्रके, चित्रफलक तयार करुन त्यास प्रसिध्दी देणे, लोकसहभागातून वाहतूक नियम व त्यांची अंमलबजावणीकरीता जनजागृती करणे, रस्ता सुरक्षा अभियान राबविणे इ. उपक्रम राबविण्यांत येतात.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने शहरात ठिकठिकाणी मो.वा.का.अंतर्गत कार्यवाही करण्यांत येते.

प्रादेशिक परिवहन अधिकारी व वाहतूक शाखेमार्फत शाळा, महाविद्यालये, कोचींग क्लासमधील विद्यार्थी यांना अवैध प्रवासी वाहतूकीमुळे होणारे नुकसान व वाहतूकीचे नियम सोप्या सरळ पध्दतीने समजावून सांगणे व त्यांची अंमलबजावणी करुन घेण्यांत येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाढीव मुद्रांक शुल्कास लातूर जिल्ह्यातील विधिज्ञांचा विरोध होत असल्याबाबत**

**(३०) ११५२७९ (२७-०३-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने मुद्रांक शुल्कामध्ये तिपटीने वाढ केल्याने लातूर जिल्ह्यातील सर्व विधिज्ञांकडून याला विरोध होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करून सदरच्या मुद्रांक शुल्कातील वाढ कमी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०८-२०१८) :** (१) महाराष्ट्र विधानमंडळाने माहे जानेवारी २०१८ मध्ये महाराष्ट्र न्यायालय शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०१७ पारित केला असून सदर अधिनियमान्वये न्यायालयीन शुल्कात वाढ करण्यात आली. लातूर जिल्ह्यातील सर्व विधिज्ञानांकडून याला विरोध असल्याचे दिनांक २५.०१.२०१८ चे लातूर बार असोसिएशन चे निवेदन या विभागास प्राप्त झाले होते, हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र न्यायालय फी (सुधारणा) अधिनियम, २०१७ च्या कलम १ (२) अन्वये अधिनियम अंमलात आणण्याबाबतची अधिसूचना अद्याप निर्गमित करण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडाळा पश्चिम, मुंबई येथील अनाथ आश्रमातील मुलगा बेपत्ता झाल्याबाबत**

**(३१) ११५३७४ (१२-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडाळा पश्चिम, मुंबई येथील अनाथ आश्रमामध्ये शिकत असलेला मुलगा बेपत्ता झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादारम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली गेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१८) :** (१) व (२) होय.
अशा प्रकारची घटना माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये माटुंगा पोलीस स्टेशन येथे घडली आहे.
(३) सदर प्रकरणी माटुंगा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३३/२०१८, भा.दं.वि. कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील मुलगा मोहम्मद जुनेद हबीब अन्सारी हा दिनांक ०७.०२.२०१८ रोजी शेल्टर होम मधुन न सांगता निघुन गेला होता. मात्र बेपत्ता झालेला मुलगा हा दिनांक २०.०३.२०१८ रोजी परत आलेला असुन त्याने स्वतःहुन अजमेर येथे गेल्याचे सांगितले, तसे पत्र शेल्टर होम, डॉन बॉस्को यांनी दिलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेड तालुक्यात (जि.पुणे) बोगस सामाजिक संघटनांकडून दहशतीचे वातातवरण निर्माण होत असल्याबाबत**

**(३२) ११५७३२ (१२-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड तालुक्यात (जि.पुणे) विशेषतः चाकण शहरात गत २० वर्षात औद्योगिक विकास झपाट्याने वाढल्याने याठिकाणी शहरीकरण वाढून लोकसंख्या पण मोठ्या प्रमाणात वाढली असून वैयक्तिक अर्थकारणासाठी स्वयंघोषित बोगस सामाजिक संघटना निर्माण होण्याचे प्रमाणही सध्या खूप वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसात खोट्या तक्रारी देणे, तडजोडी करणे, ब्लाकमेल करणे, रस्त्यावर बेकायदा टपऱ्या लावणे, गोरगरीब भाजी विक्रेते, किरकोळ व्यावसायिक, अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांकडून पैसे वसुली करणे असे धंदे करणाऱ्या बोगस संघटनांमुळे समाजाचे वातावरण बिघडून गरीब जनतेवर अन्यायकारक दहशत निर्माण केल्यामुळे सामान्य नागरिकांमधे भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने अशा संघटनांची गुप्तचर यंत्रणेमार्फत सखोल चौकशी करून त्यांच्यावर तत्काळ बंदी आणून कायदेशीर कारवाई करावी अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास सहायक पोलीस आयुक्त राजगुरुनगर यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनाने एकूण किती बोगस संघटनांची चौकशी करून त्या तत्काळ बंद करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१), (२) व (३) पोलीसात खोट्या तक्रारी देणे, तडजोड करणे, ब्लॅकमेल करणे, रस्त्यावर बेकायदा टपऱ्या लावणे, गोरगरीब भाजी विक्रेते किरकोळ व्यावसायिक, अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्यांकडून पैसे वसूली करणे इत्यादी बाबत दिनांक १२/२/२०१८ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड उपविभाग यांचे कार्यालयात मा. श्री.सुरेश गोरे, आमदार खेड-आळंदी विधानसभा मतदार संघ यांचे निवेदन प्राप्त झाले आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड व पोलीस निरिक्षक चाकण पोलीस स्टेशन यांना प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक, चाकण पोलीस स्टेशन हे चौकशी करीत आहेत. तसेच निवेदनातील मजकुराप्रमाणे गोपनीय चौकशी सुरु असुन चौकशी दरम्यान बोगस संघटना आढळून आल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### डहाणू नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांना ठेकेदाराकडून लाच घेतांना अटक केल्याबाबत

**(३३) ११६०८३ (१२-०४-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विनोद डवले यांना एका ठेकेदाराकडून रुपये ९५ हजारांची लाच घेतांना दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिका-यांनी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०८-२०१८) :** (१) आरोपी लोकसेवक विनोद महादेवराव डवले, मुख्यधिकारी, डहाणू नगरपरिषद, डहाणू, जि. पालघर (वर्ग-२) यांना रु ९५,०००/- लाचेची मागणी करून ती स्विकारताना दि. १९.०१.१८ रोजी १६.२० वा डहाणू नगरपरिषद, डहाणू कार्यालयात रंगेहाथ पकडण्यात आले असून त्यांच्याविरूध्द डहाणू पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक ०१/२०१८, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे दि. २०.०१.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) आरोपी लोकसेवक श्री.विनोद डवले यांना नगर विकास विभागाच्या दिनांक ०९.०४.२०१८ रोजीच्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले आहे. त्यांविरूध्दच्या गुन्हयाचा तपास सुरू आहे.

---

**उंचखडक बु. (ता. अकोले,जि.अहमदनगर) येथे झालेला बालकाच्या खुनाचा तपास संथगतीने होत असल्याबाबत**

**(३४) ११६५७९ (२३-०५-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंचखडक बु. (ता.अकोले, जि.अहमदनगर) येथील कु.वेदांत देशमुख या बालकाच्या खुनाबाबत तपास अपूर्ण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी संथ गतीने होत असल्याने आरोपी मोकाट फिरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हत्याप्रकरणाची चौकशी करणारे अधिकारी वारंवार बदलत असल्याने चौकशी पूर्ण होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी अकोले पोलीस स्टेशन गु.र.नं.१५३/२०१५ भा.दं.वि.क. ३०२,३६३,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली असून, उक्त आरोपीस मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी जामीन मंजुर केलेला आहे. सदर आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

उक्त प्रकरणी तपासाकरीता पोलीस निरीक्षक, सायबर सेल यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. गुन्ह्यातील उर्वरीत आरोपी निष्पन्न होण्याच्या दृष्टीने व आरोपीविरूध्द भक्कम पुरावा प्राप्त होण्याच्या दृष्टीने गुन्ह्यातील आरोपीं व साक्षीदारांची BEOS चाचणी पुर्ण करण्यात आली आहे. तसेच आरोपी व साक्षीदारांची नार्को चाचणी लवकरच पुर्ण करण्यात येत आहे. सदर गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(५) विलंब झालेला नाही.

---

**किल्ले सिंधुदुर्ग (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) नजीकच्या समुद्रात ४ ठिकाणी मोरिंग बोया बसविण्यात आल्याबाबत**

**(३५) ११७२७९ (३०-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किल्ले सिंधुदुर्ग (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) नजीकच्या समुद्रात ४ ठिकाणी मोरिंग बोया बसविण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक मच्छिमारांना मच्छिमारीसाठी त्रास होऊ नये यासाठी मेरिटाईम बोर्डाने सर्वेक्षण करुन मोरिंग बोया यांच्या जागा ठरविल्या आहेत काय व यासाठी प्रादेशिक बंदर अधिकारी यांचीही परवानगी घेण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१८) :** (१) होय.

(२) वन विभाग (मालवण), युएनडीपी सिंधुदुर्ग प्रकल्प यांचे प्रतिनिधी आणि स्थानिक स्कूबा ड्रायव्हिंग व्यावसायिक यांच्या समवेत प्रादेशिक बंदर अधिकारी, वेंगुर्ला यांनी पाहणी करुन मोरिंग बोया यांच्या जागा निश्चित केलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसुचित जाती-जमातीची खोटी प्रमाणपत्रे सादर करुन नोकरी मिळवणा-या कर्मचा-यांबाबत**

**(३६) ११७२८६ (२७-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.नारायण पाटील (करमाळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राज्यातील अनुसुचित जाती-जमातीची प्रमाणपत्रे खोटी ठरल्याने ११ हजार ७०० कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्यांवर गदा आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांवरील कारवाईला स्थगिती देऊन मा.मुख्यमंत्री यांनी चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व उक्त चौकशी समितीने शासनास याबाबतचा अहवाल सादर केला आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) होय हे खरे आहे, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ६ जुलै,२०१७ रोजीच्या निर्णयाद्वारे अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, अथवा इतर मागासवर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासन सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतुदीशी विसंगत ठरते. असा निर्णय दिलेला आहे. बाधीत होणा-या कर्मचा-यांची मोठी संख्या विचारात घेता, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.६/७/२०१७ च्या आदेशाची एकदम अंमलबजावणी केल्यास त्याचे राज्यात दुरगामी प्रतिकुल परिणाम होऊ शकतात. याचा विचार करुन शासनाच्या विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी, राज्य शासनाचे उपक्रम, कंपनी इ. तसेच शैक्षणिक संस्था व इतर माध्यमाद्वारे दिलेल्या नियुक्त्यांची सर्वकष छाननी करणे गरजेचे आहे त्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी कशा प्रकारे करावी याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी व शासनास शिफारस करण्यासाठी मा.मंत्रिमंडळाने शिफारस केल्यानुसार, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५ जून,२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार मा.मंत्री,आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर उपसमितीस ३ महिन्यात अहवाल सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे.तथापि शासनाच्या दिनांक ५ जून,२०१८ रोजीच्या शासन निर्णयास ऑरगनाईझेशन फॉर द राईट ऑफ ट्रायबल या संस्थेने मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन क्र. ३१४०/२०१८ याद्वारे आव्हान दिले असून, मा.उच्च न्यायालयाने दिनांक ११ जून,२०१८ रोजीच्या आदेशान्वये शासन निर्णयास अंतरिम स्थगिती दिलेली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## रेवस-करंजा सागरी मार्गावर रो-रो सेवेसाठी मेरिटाईम बोर्डाकडून जेट्टीच्या कामात निकृष्ट दर्जाचे सिमेंट वापरले गेले असल्याबाबत

**(३७) ११७५२९ (३०-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेवस-करंजा सागरी मार्गावर रो-रो सेवेसाठी मेरिटाईम बोर्डाकडून जेट्टीच्या कामात निकृष्ट दर्जाचे सिमेंट वापरले गेले असल्यामुळे १५ दिवसांतच मोठे तडे गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जेट्टीच्या कामासाठी अद्यापपर्यंत रुपये ४ कोटींचा खर्च मेरिटाईम बोर्डाने केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, समुद्राच्या लाटांच्या तडाख्यांना तोंड देणारी जेट्टी भक्कमपणे उभारण्यासाठी कोणत्या ठेकेदाराला कंत्राट देण्यात आले होते व त्याने निकष्ट दर्जाच्या केलेल्या जेट्टीच्या कामाची चौकशी करुन त्याच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत रेवस जेट्टी येथील पोचरस्ता बांधणे हे काम हाती घेण्यात आलेले असून ते ठेकेदार मे.सुभाष कंस्ट्रक्शन यांना देण्यात आलेले आहे. तसेच करंजा येथील रो-रो जेट्टीच्या कामाचे कार्यादेश श्री.आर.बी.चव्हाण यांना देण्यात आले असून सद्यस्थितीत दोन्ही कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली योग्य व गुणवत्तेप्रमाणे करुन घेण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाच्या विविध योजनांचे थेट लाभ हस्तांतरणातून (डीबीटी)**
**कांही लाभ वगळण्याच्या केलेल्या मागणीबाबत**

**(३८) ११७७९० (२३-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय योजनांच्या लाभासाठी "थेट लाभ हस्तांतरण" (डीबीटी) प्रक्रियेत अडचणी येत असल्याने थेट लाभ हस्तांतरणातून काही लाभ वगळण्याच्या मागणीबाबत उचित निर्णय घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारची समिती स्थापन केली आहे काय,

(३) असल्यास, या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, समितीच्या शिफारशीचे स्वरुप काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, सामान्य प्रशासन विभाग (मातं) यांच्या दि. १६/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांचे लाभ संबंधित लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) द्वारे प्रदान करण्याकरीता विविध विभागांमार्फत करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे संनियंत्रण करण्यासाठी व विभागांना मार्गदर्शन करण्यासाठी राज्यस्तरीय प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) समितीची अपर मुख्य सचिव(वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आली आहे.

(२) व (३) वरील प्रमाणे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालवाहू गाड्याची चोरी करून खरेदी-विक्री करणा-या टोळीच्या म्होरक्याला औरंगाबाद येथे अटक केल्याबाबत**

**(३९) ११८०४२ (३०-०७-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आणि गुजरात मधून मालवाहू गाड्यांची चोरी करून त्यांच्या खरेदी-विक्री करणा-या टोळीच्या म्होरक्याला माहे मे, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान औरंगाबाद येथून अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार संबंधित आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :**(१) व (२) सदर प्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन सिडको, औरंगाबाद येथे गु.र.नं. १००/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांनी धुळे, हरियाना व पंजाब येथुन आणलेले एकूण १८ ट्रक, एक स्विफ्ट डिझायर कार जप्त करण्यात आलेली आहे. जप्त केलेल्या ट्रक चे चेसीस इंजीन मध्ये फेरबदल केलेला दिसून येत असल्याने या ट्रकची तपासणी होवून मुळ चेसीस इंजिन नंबर मिळणेबाबत उपसंचालक, प्रादेशीक न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, म.शा. औरंगाबाद यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**कोल्हापूर शहरातील अंबाबाई मंदिर देवस्थान समितीच्या कारभाराबाबत**

**(४०) ११८२२६ (२३-०७-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील अंबाबाई मंदिरात सरकारी पुजारी नेमणूकीच्या विधेयकांमध्ये देवस्थान समितीतील भ्रष्टाचार, आजतागायत न लागलेला हिशोब, मालमत्त्तेचे लेखापरिक्षण अशा असंख्य प्रश्नाबाबत कोणताही विचार झालेला नसल्याने मंदिर विश्वस्त समितीकडे सध्याच्या देवस्थान समितीचा कारभार कसा हस्तांतरीत केला जाणार आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व बाबींचा शासन विचार करून या संदर्भात दुसरे विधेयक सदर विधेयकांत सुधारणा करणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.
तथापि, देवस्थान समितीतील कारभार व आजतागायत न लागलेला हिशेब, मालमत्तेचे परीक्षण याबाबत झालेल्या आरोपाची राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांच्या मार्फत चौकशी सुरु आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सोयी सुविधा, आर्थिक लाभ अत्यंत तुटपुंजे असल्याबाबत**

**(४१) ११९५१३ (२८-०७-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नक्षलग्रस्त आणि आदिवासी क्षेत्राला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा भागात कार्यरत अधिकारी कर्मचाऱ्यांचे बळकटीकरण करण्यासाठी विविध सवलती देण्यासंदर्भात दिनांक ६ ऑगस्ट, २००२ रोजीचा शासन निर्णय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील वस्तुस्थिती व विकास कामांची पाहणी केली असता येथे कार्यरत कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सोयी सुविधा, आर्थिक लाभ अत्यंत तुटपुंज असल्याचे माहे मार्च २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कर्तव्य बजावणारे अधिकारी कर्मचाऱ्यांची निवासस्थाने योग्य नाही, त्यांना मिळणारा आर्थिक लाभ वेळेवर मिळत नाही, इत्यादी बाबींचा परिणाम विकास कामांवर होत असून सदर भागातील कर्मचाऱ्यांवरील अन्याय दूर करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०१८) :** (१) आदिवासी व नक्षलग्रस्त भागात अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबतची मार्गदर्शक तत्वे विहित करण्यासाठी आणि या भागात सेवारत अधिकारी/ कर्मचाऱ्यांना प्रोत्साहीत करण्याकरीता विविध सवलतींबाबतचे एकत्रित आदेश देण्याच्या दृष्टीने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. ०६.०८.२००२ निर्गमित करण्यात आला आहे.

(२) व (३) राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या विद्यमान सवलतींचे पुनर्विलोकन करुन बदलत्या परिस्थितीत अनुज्ञेय करावयाच्या आर्थिक व बिगर आर्थिक सवलतींचा अभ्यास करुन शासनास शिफारस करण्याकरिता विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती.

या समितीने आपला अहवाल सादर केला असून, त्याद्वारे करण्यात आलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने वित्त विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांच्याशी सल्लामसलत करुन कार्यवाही करण्याचे शासन स्तरावर प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या सेवेतील अनेक राजपत्रित व सनदी अधिका-यांना देण्यात येणा-या शासकिय निवास स्थानाबाबत

**(४२) १२००३३ (२८-०७-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील अनेक सनदी, शासकीय व न्यायीक अधिका-यांनी मुंबईत व मुंबई उपनगरात अल्प दरात सरकारी भुखंड घेवून त्यावर गृहनिर्माण सह.सोसायट्या स्थापन करुन स्वत:चे मालकी हक्काची घरे घेतली असल्याचे माहे मार्च २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकाऱ्यांची स्वत:ची घरे मुंबई व मुंबई उपनगरात आहेत अशा अधिकाऱ्यांना शासकीय निवासस्थानाचे वाटप करण्यात येऊ नये अशा आशयाचे सन २००५ मधील शासन निर्णय रद्द करण्यामागची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच सदरहू अधिकाऱ्यांची बदली झाल्यानंतर शासकीय निवासस्थाने तात्काळ परत न करता अवैधरित्या दोन शासकीय निवासस्थांनाचा वापर करत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मुंबई व मुंबई उपनगरात स्वत:चे निवासस्थान असलेल्या सनदी शासकीय व न्यायिक अधिकाऱ्यांसह बदली नंतरही निवासस्थाने स्वत:च्या ताब्यात ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात आणि स्वत:च्या मालकीची घरे असतांनाही सदरहू घरे भाड्याने देऊन अथवा रिक्त ठेवून शासकीय निवासस्थाने बळकावणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व तद्नुसार दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) मुंबई व मुंबई उपनगरात स्वत:ची घरे आहेत अशा अधिका-यांना शासकीय निवासस्थानाचे वाटप करण्यात येऊ नये अशा आशयाचा सन २००५ मधील शासन निर्णय नाही. तथापि, दि.३ जून,२००८ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार बृहन्मुबईतील कार्यालयात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या निवासस्थानाच्या ५०% पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे सवलतीच्या माध्यमाने स्वत: च्या मालकीचे निवासस्थान बृहन्मुंबईत घेतले असल्यास त्यांना बृहन्मुबईतील शासकीय निवासस्थान अनुज्ञेय नाही. तसेच मुंबई उपनगरातील कार्यालयात कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या

निवासस्थानाच्या ५०% पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे सवलतीच्या माध्यमाने स्वत: च्या मालकीचे निवासस्थान मुंबई उपनगरात घेतले असल्यास त्यांना मुंबई उपनगरातील शासकीय निवासस्थान अनुज्ञेय नाही.

शासकीय सेवेतून सेवानिवृत्त/ बदली झाल्यानंतर शासकीय निवासस्थानात राहण्याचा अनुज्ञेय कालावधी संपुष्टात आल्यानंतरही शासकीय निवासस्थान रिक्त न केल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित कार्यालयामार्फत दंडनीय भाडे आकारणी करण्यात येते. त्यानंतर सक्षम प्राधिका-यामार्फत निष्कासनाची कारवाई केली जाते. ही प्रक्रिया नियमितपणे अवलंबविण्यात येते. वरिष्ठ अधिकारी (वर्ग-१ व त्यावरील दर्जाचे भाप्रसे/भापोसे) यांची मुंबई व उपनगरात स्वत:च्या मालकीची घरे असली तरी त्यांच्या पदाची कर्तव्ये/जबाबदारी विचारात घेता त्यांना बृहन्मुंबईत कार्यरत असेपर्यंतच्या कालावधीकरीता शासकीय निवासस्थाने वाटप केली जातात. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गव्हर्नमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपिंग बेसीक कोर्सचा समावेश सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभागाच्या शासन आदेशात होण्याबाबत**

**(४३) १२०६६५ (०३-०८-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत सुरु झालेल्या गव्हर्नमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपिंग बेसीक कोर्सचा (GCC-TBC) दिनांक ८ जानेवारी २०१८ च्या सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभागाच्या शासन आदेशात समावेश करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कॉम्प्युटर टायपिंग टंकलेखन लघुलेखन संघटनेच्या वतीने माहे मे २०१८ मध्ये वा त्या दरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संगणक टायपिंग बेसीक कोर्स पुर्ण केलेले अनेक विद्यार्थी हे नोकरीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासनमान्य संगणक टायपिंग कोर्सचा समावेश यापुढील नोकर भरतीसाठी संगणक अर्हता म्हणून मान्यता देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर बाब महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना यांच्या निवेदनान्वये निर्दशनास आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत सुरू झालेल्या गव्हर्नमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपिंग बेसीक कोर्सचा (GCC-TBC) समावेश संगणक अर्हता परीक्षा मध्ये सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन पूरकपत्र क्र. मातंसं २०१२/प्र.क्र.२७७/ ३९, दिनांक १६ जुलै, २०१८ अन्वये करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपुर (जि.सोलापुर) येथील श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती मधील कर्मचा-यांनी विविध मांगण्याकरीता केलेले उपोषण**

**(४४) १२१०४८ (२३-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपुर (जि.सोलापुर) येथील श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीमध्ये कार्यरत सर्व २८७ कर्मचा-यांना आकृतीबंध मंजूर होईपर्यंत किमान वेतन देण्यात यावे, मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी तातडीने करावी व सर्व कर्मचा-यांना सेवा नियम लागु करावा अशा विविध मागण्यांसाठी मंदिर समिती कर्मचा-यांनी दिनांक १ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास शिवाजी चौक पंढरपुर येथे उपोषण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापपर्यंत शासनाने वा मंदिर समितीने नाकारण्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच, मंदिर समिती कर्मचारी यांच्या प्रशासनाने मंजूर केलेल्या मागण्या लागु करण्याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
मंदिर समिती कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी दि.०१.०५.२०१८ रोजी शिवाजी चौक पंढरपूर येथे उपोषण केले होते.
(२) दि.२९.११.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर आस्थापनेवरील २२७ पदाचा आकृतीबंध मंजुर करण्यात आला असून या पदांचे सेवा विनियम तयार करुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे समितीला कळविण्यात आले आहे.
(३) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर या आस्थापनेवरील आकृतीबंधात मंजुर पद संवर्गाचे सेवाप्रवेश नियम व सेवा विनियम तयार करण्याची बाब प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपुर (जि.सोलापुर) येथील श्री.विठ्ठल रुख्मिणी मंदिर समितीच्या वतीने संत तुकाराम महाराज विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत**

**(४५) १२१२५२ (२६-०७-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपुर (जि. सोलापुर) येथील श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर समितीच्या वतीने संत तुकाराम महाराज विद्यापीठाची स्थापना लवकरच करण्यात येणार असल्याचे दिनांक २१ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मार्गदर्शक समिती स्थापन करून त्यामध्ये विविध क्षेत्रातील १५ मान्यवर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पंढरपुर येथील संत विद्यापीठ स्थापन करण्यासाठी शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.

याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(२) होय.

समिती स्तरावर विविध क्षेत्रातील १५ मान्यवर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) सदर बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उच्च न्यायालयाचे सर्कीट बेंच कोल्हापूर येथे स्थापन करण्याबाबत**

**(४६) १२२००३ (२६-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या ५ जिल्ह्यांकरिता उच्च न्यायालयाचे सर्कीट बेंच कोल्हापूर येथे स्थापन करण्याचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) कोल्हापूर जिल्हा व सलगच्या सांगली, सातारा, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व सोलापूर या जिल्ह्यांच्या वतीने विविध वकीलांच्या संघटनांनी आंदालने काढून, उपोषण करून तसेच शासन दरबारी सर्व कागदपत्रे जमा करून विविध मार्गानी गत ३० वर्षापासून प्रलंबित असलेल्या कोल्हापूर येथील खंडपीठ सुरू करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू

ठेवले असून अद्याप त्यांच्या प्रयत्नांना योग्य प्रकारे न्याय मिळाला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ६२ हजार खटले न्यायालयात प्रलंबित असल्याची बाब उघडकीस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य मंत्री मंडळाने घेतलेल्या सदर निर्णयाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व मान्यतेसाठी प्रस्ताव उच्च न्यायालयाकडे पाठविण्यात आला आहे काय, प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे तसेच हे सर्कीट बेंच केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे,

(५) अद्यापपर्यंत कोल्हापुर येथे सर्कीट बेंच बांधण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०८-२०१८) :** (१) होय.

(२) उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी त्यास राज्य पुर्नरचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५१(२) नुसार मा. मुख्य न्यायमूर्तींची सहमती आवश्यक आहे. त्यानुसार राज्य मंत्रीमंडळाच्या मान्यतेने उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ कोल्हापूर येथे स्थापन करण्यास मान्यता देण्याची शिफारस मा. मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यात आली आहे.

(३) राज्यातील न्यायालयांतील प्रलंबित खटल्यांची संख्या मोठी आहे.

(४) राज्य मंत्रीमंडळाच्या दि.१२/०५/२०१५ रोजीच्या बैठकीत घेतलेला निर्णय हा शिफारस स्वरुपातील आहे. तशी शिफारस मा. मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना शासन पत्र, दि.१७/०७/२०१५ अन्वये करण्यात आली आहे. शासनाच्या सदर शिफारशीचा पुनर्विचार करण्याची विनंती मा. मुख्य न्यायमुर्ती यांना शासन पत्र, दि. २८/०२/२०१८ अन्वये करण्यात आली आहे. प्रस्ताव उच्च न्यायालयाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील धर्मादाय रुग्णालये गोरगरीबांना उपचार नाकारत असल्याबाबत**

**(४७) १२२४८६ (२७-०७-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्मादाय रुग्णालयांमधील १० टक्के खाटा गरीबांसाठी राखीव आहेत परंतू ग्रामीण भागांमधून येणा-यांना कोणत्या रुग्णालयांमध्ये किती खाटा शिल्लक आहेत याची माहिती दिली जात नसल्याने त्याचा फायदा घेऊन काही रुग्णालये खाटा शिल्लक नसल्याचे सांगत गोरगरीब रुग्णांना उपचार नाकारतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धर्मादाय रुग्णालयातील उपचारासाठी आर्थिक दुर्बलांच्या उत्पन्नाची मर्यादा फार कमी असल्याने आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांना उपचार मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील धर्मादाय रुग्णालये गोरगरीब रुग्णांवर उपचार नाकारणा-या रुग्णालयांवर कारवाई करुन उपचारासाठी असलेली उत्पन्न मर्यादा रुपये ८५ हजाराहून १ लाख ६० हजार करण्याची घोषणा मा.विधी व न्याय राज्यमंत्री महोदयांनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आर्थिक दुर्बलांच्या उत्पन्नाची मर्यादा वाढविण्याबाबत तसेच उपचार नाकारणा-या धर्मादाय रुग्णालयांवर कारवाई करण्याबाबत तसेच शहरातील धर्मादाय रुग्णालयांमधील रिकाम्या खाटांची माहिती बोर्डावर लावण्याची सक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०८-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम ४१ कक अंतर्गत निर्धन व्यक्ती व समाजातील दुर्बल घटकातील व्यक्ती यांची व्याख्या करण्यात आली असून त्यांच्या उत्पन्नाची मर्यादा शासन राजपत्रातील अधिसुचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्याची तरतुद करण्यात आली आहे.

(३) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब विधि व न्याय विभाग, दि.२३.०२.२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे निर्धन व्यक्तींच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. ८५,०००/- व दुर्बल घटकातील व्यक्तींच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु.१,६०,०००/- इतकी विनिर्दिष्ट करण्यात आलेली आहे.

(४) मा.उच्च न्यायालयाने आदेशित केलेल्या योजनेची अंमलबजावणी करण्यात कसूर करण्या-या राज्यातील १२ रुग्णालयांविरुद्ध फौजदारी प्रकरण दाखल करण्यात आले असून, १४ रुग्णालयांना शासकीय विभाग/प्राधिकरणाकडून प्रदान करण्यात आलेल्या सोयी सुविधा काढून घेण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच, ७ रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, १३ रुग्णालयांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. तसेच ३ रुग्णालयांविरुद्ध महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील कलम ४१ (ड) नुसार आवश्यक कारवाई करण्यात येत आहे.

धर्मादाय रुग्णालयांनी तेथे येणा-या निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना योजनेतील तरतुदीनुसार त्यांचेसाठी किती खाटा राखीव आहेत, त्यापैकी किती खाटा व्याप्त आहेत व किती खाटा उपलब्ध आहेत याबाबतची दैनंदिन स्थिती दर्शनी भागात लावणेबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले असून, सदर निर्देशांची अंमलबजावणी होत आहे किंवा कसे या बाबत धर्मादाय आयुक्त कार्यालयामार्फत होणाऱ्या रुग्णालय निरिक्षणाच्यावेळी तपासणी केली जाते, असे धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र यांनी कळविले आहे.

तसेच, धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर हॉस्पिटल मॉडयुल गो-लाईव्ह करण्यात आले असून,सदर मॉडयुल मध्ये आरक्षित खाटांबाबतची सद्य:स्थिती रिअल टाईम बेसीस वर उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व धर्मादाय रुग्णालयांना सक्त निर्देश देण्यात आले आहेत, जेणेकरुन पात्र व गरजू रुग्णांना त्यांच्यासाठी आरक्षित असलेल्या खाटांची दैनंदिन स्थिती अवगत होईल.

तसेच पथदर्शी प्रकल्प म्हणून, मुंबईतील धर्मादाय रुग्णालयांतील राखीव खाटांबाबतची दैनंदिन सद्य:स्थिती तेथे येणा-या निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना अवगत होण्याकरीता मुंबईतील दोन शासकीय व तीन महानगरपालिका रुग्णालयांत स्मार्ट टि.व्ही. स्थापित करण्यात आलेले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकिय कर्मचा-यांना एमएस-सीआयटी प्रशिक्षण अनिवार्य केल्याबाबत**

**(४८) १२३४६३ (२८-०७-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकिय कर्मचा-यांना एमएस-सीआयटी प्रशिक्षण अनिवार्य केले असून बहूतांश कर्मचा-यांनी प्रशिक्षण पुर्ण न केल्याने त्यांची वेतनवाढ रोखणे व वसुली सुरु करण्याबाबत शासनाने निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत एमएस-सीआयटी प्रशिक्षणास दिनांक ३१ डिसेंबर २०१८ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्याकरीता मा.राज्यमंत्री, सामान्य प्रशासन विभाग, यांच्या मंत्रालयीन दालनात दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास बैठक आयोजित करुन मुदतवाढ देण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमएस- सीआयटी प्रशिक्षणास दिनांक ३१ डिसेंबर २०१८ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

मा.राज्यमंत्री, सामान्य प्रशासन विभाग यांनी त्यांच्या मंत्रालयीन दालनात दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजीच्या बैठकीत राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना एमएस-सीआयटी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहे.

(३) सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयांकडून शासन सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क मधील ज्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी विहीत कालावधीत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केले नाही व त्यामुळे त्यांच्या वेतनवाढी रोखल्या गेल्या आहेत, इत्यादी बाबत माहिती मागविण्यात आली असून ती प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुकंपाधारकांच्या विविध मागण्यांबाबत**

**(४९) १२३४६४ (२८-०७-२०१८). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुकंपाधारकांच्या विविध मागण्यांकरीता राज्यमंत्री सामान्य प्रशासन यांच्या मंत्रालयीन दालनात दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी वा त्या सुमारास सयुंक्त बैठक आयोजीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनुकंपाधारकासाठी काढण्यात आलेला शा.नि.सा.प्र.वि. दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी अन्वये पद भरतीवरील निर्बंध असेपर्यंत अनुकंपा नियुक्तीसाठी

भरावयाच्या मान्यता असलेल्या पदाच्या २० % मर्यादा विहीत करूनही त्याची अंमलबजावणी सर्व विभागातून होत नसल्याने त्याची अंमलबजावणी त्वरीत करण्याचे व अहवाल मागविण्याचे निर्देश देवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही विभागाकडून झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत त्वरीत अंमलबजावणी करून राज्यातील सर्व अनुकंपाधारकांना त्वरीत शासन सेवेत घेणेबाबत व राज्यमंत्री महोदयांनी बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०८-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अनुकंपा तत्वावर नियुक्तीबाबतची त्रैमासिक माहिती अनुकंपा नियुक्ती योजनेनुसार गट-क व ड संवर्गातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून (संबंधित विभागीय कार्यालयामार्फत) घेण्यात येते. दि.२५.०४.२०१८ रोजीच्या बैठकीपूर्वी दि.२०.०४.२०१८ च्या पत्रान्वये त्रैमासिक आढाव्याची माहिती मागविताना शा.नि.दि.१५.०२.२०१८ भरतीस मान्यता असलेल्या पदांच्या २०% पदे अनुकंपा नियुक्तीद्वारे भरण्याचे कळविण्यात आले. तसेच दि.२५.०६.२०१८ च्या पत्रान्वये क्षेत्रिय कार्यालयांना अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याबाबत सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविण्यात आले. तसेच दि.०२.०७.२०१८ च्या पत्रान्वये शा.नि. दि.१५.०२.२०१८ नुसार २०% च्या मर्यादेत गट-क व ड संवर्गातील अनुकंपा नियुक्तीच्या प्रतिक्षासूचीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत व केलेल्या कार्यवाहीची माहे एप्रिल, २०१८ ते जून, २०१८ या कालावधीतील माहिती विहित विवरणपत्रामध्ये सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार माहे एप्रिल, २०१८ ते जून, २०१८ या कालावधीतील अनुकंपा नियुक्तीची माहिती प्राप्त झाली आहे. त्यानुसार अनुकंपा तत्वावर गट-क व गट-ड मध्ये दि.०१.१०.२०१७ ते ३१.१२.२०१७ या कालावधीत एकूण १२७, दि.०१.०१.२०१८ ते ३१.०३.२०१८ या कालावधीत एकूण २१५ व दि.०१.०४.२०१८ ते ३०.०६.२०१८ या कालावधीत एकूण २३३ नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. यावरुन शासन निर्णय दि.१५.०२.२०१८ नुसार २०% च्या मर्यादेत गट-क व ड संवर्गातील अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत आदेश निर्गमित केल्यानंतर अनुकंपा नियुक्तीमध्ये वाढ झालेली असल्याचे दिसून येते.

---

**नागपूर येथे विविध सोयी-सुविधायुक्त आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सभागृहाचे बांधकाम करण्याचा घेतलेला निर्णय**

**(५०) १२३७१३ (२८-०७-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजी मुख्यमंत्री कै वंसतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्याने शासनाने समिती स्थापन करून रुपये १०० कोटींची तरतुद करून नागपूर येथे सर्व सोयी-सुविधायुक्त आंतरराष्ट्रीय दर्जाचे सभागृहाचे बांधकाम करण्याबाबत निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सभागृहाचे बांधकाम करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०८-२०१८) :** (१) माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०२/११/२०१२ रोजी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित करण्याकरीता रु. १०० कोटी इतकी तरतूद करण्यात आली होती. सदर निधीपैकी रु. २० कोटी इतका निधी नागपूर येथे विविध सोयी-सुविधायुक्त सभागृह उभारणीकरीता वर्गीकृत केला असून सदर निधी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

(२) माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाकडून दि. २१ जून, २०१८ रोजी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना जागा हस्तांतरीत करण्यात आली आहे. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सदर कामाची अंदाजपत्रकीय किंमत रु.१९,७१,३०,११९/- इतकी निश्चित करण्यात आली असून रु. १६,४९,६२,४४३/- इतक्या कामाची ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे. प्राप्त निविदांची तांत्रिक पडताळणी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.